दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजय भांगे
बीड/महाराष्ट्र | रविवार दि.१ डिसेंबर २०२४ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक -९७ | पाने ४ | किंमत ४ रुपये

## शिवसेनेचा गृह खात्यावर दावा विजयात आमचा मोठा वाटा

**मुंबई (वृत्तसंस्था)**–महायुतीच्या विजयात शिवसेनेचा मोठा वाटा आहे. पण त्यानंतरही भाजप आम्हाला गृह खाते देण्यास विरोध का करत आहे हे समजत नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांनी राज्याच्या गृहमंत्रीपदावर दावा सांगितला आहे. एकनाथ शिंदे यांनी बुधवारी एका पत्रकार परिषदेद्वारे मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीतून माघार घेतल्याचे स्पष्ट केले. यामुळे देवेंद्र फडणवीस यांचा मुख्यमंत्रीपदाचा मार्ग मोकळा झाल्याचे चित्र आहे. पण शिवसेनेने गृहमंत्रीपदासारख्या महत्त्वाच्या खात्याची मागणी केल्यामुळे महायुतीच्या सत्तेचे घोडे अडले आहे. शिवसेना प्रवक्ते संजय शिरसाट यांनी शुक्रवारी एका वृत्तवाहिनीशी बोलताना शिवसेनेला राज्याचे गृहमंत्रीपद हवे असल्याचे ठणकावून सांगितले. तसेच एकनाथ शिंदे आज सायंकाळपर्यंत उपमुख्यमंत्रीपदावरील आपली भूमिका स्पष्ट करतील असा अंदाजही व्यक्त केला. संजय शिरसाट म्हणाले, एकनाथ शिंदे महाराष्ट्र सोडून केंद्रात जाणार नाहीत हे निश्चित आहे. त्यांची राज्यात कॉमन मॅन म्हणून ओळख निर्माण झाली आहे. त्यामुळे दिल्लीला जाणे शक्य नाही.

### महायुतीत सीएमपदावरुन रस्सीखेच नाही

# निरीक्षक आले की भाजपचा गटनेता निवडला जाईल मग सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा-चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई (वृत्तसंस्था)**–पक्षाचे निरीक्षक तर राज्यात येणारच आहे. ५ तारखेला संभाव्य मंत्रिमंडळाचा शपथविधी आहे. यात काही वावड्या डठवण्याची गरज नाही. निरीक्षक आले की नेते निवडले जातील, त्यातून सरकारचा मार्ग मोकळा होईल असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.

चंद्रशेखर बावनकुळे पुढे बोलताना म्हणाले की, कोणत्याही सरकार स्थापनेबद्दल चर्चा ह्या बातम्या आणि माध्यमांतील चर्चेवर होऊ शकत नाही. जो निर्णय घेतील तो देवेंद्र फडणवीस, अजित पवार, एकनाथ शिंदे मिळून घेतील आणि त्याला आमचे केंद्रीय नेतृत्व मान्यता देईल. कुणी मिडीयाला काही बोलले तर सरकार स्थापन होत नसते असेही त्यांनी म्हटले आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, संजय राऊत हे सध्या अस्वस्थ आहेत. त्यांचे आमदार कमी झाले. त्यांना कुणी विचात नाही. काँग्रेस आपला वेगळा विचार करत आहे. त्यामुळे ते अस्वस्थ आहेत. अशा मानसिकतेमध्ये लोकं असेच बोलतात. स्वस्थ मानसिकतेमध्ये राऊत आले की त्यांचे आम्ही ऐकू.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, नागपूरमधील विरोधी पक्षनेत्याचा बंगला कुणाला देणार हे आम्हाला माहिती नाही. पण माझी मविआतील नेत्यांना विनंती राहणार आहे मी त्यांना सूचना देणार नाही, २०२९ मध्ये तिघांपैकी कुणाकडे तरी विरोधीपक्षनेते पद राहील याची काळजी घ्यावी. ऐवढी तयारी त्यांनी २०२९ पर्यंत केली पाहिजे.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, महायुतीमधील तिन्ही पक्षात कुठेच रस्सीखेच नाही. अजितदादा आणि आमच्यात कुठेच रस्सीखेच नाही. आम्ही मिडीयात एक अन् तिकडे एक बोलतो असे काही नाही. आम्ही तिघे सख्ये भाऊ एकत्र आहोत. सावत्र भाऊ हे एतच् वर बोट ठेवत वेळकाढू पणा करत आहे, असे म्हणत त्यांनी मविआवर टीकास्त्र डागले आहे. एकनाथ शिंदे हे प्रगल्भ नेते आहेत, त्यांच्याबद्दल वेगळ्या बातम्या पसरवणे योग्य नाही.



## अंबाजोगाई शहरासह परिसरातही थंडीची लाट



**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगाई आणि राज्यात आता थंडीची लाट पसरली आहे. फेंगल चक्रीवादळ तयार झाल्यामुळे महाराष्ट्रात पुढील २४ तासांमध्ये तापमानात आणखी घट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पुण्यात वर्षातील सर्वात कमी तापमानाची नोंद झाली आहे. तर जळगाव शहरासह अनेक ठिकाणी तापमानात मोठी घट झाल्याचं दिसून येत आहे नागरिक थंडीपासून बचाव करण्यासाठी स्वेटर जर्कंगच्या वापरासह शेकोट्यां पेटवताना दिसून येत आहेत अंबाजोगाई शहरासह शहरासह आसपासच्या परिसरातही थंडीची लाट दिसून येत आहे. सकाळच्या सुमारास दाट धुक्याची चादर परिसरातील डोंगरांवर आणि शेत शिवारांवर पसरत आहे. दिवसभर काहीसे उन्हे जाणवल्यावर पुन्हा सायंकाळच्या सुमारास वातावरणात कमालीचा गारवा जाणवत आहे. कामगार, दुग्ध विक्रेते, शाळकरी विद्यार्थी, शेतमजूर यांना या थंडीचा सर्वाधिक सामना करावा लागत आहे. पश्चिम महाराष्ट्रासह, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातही थंडीत वाढ झाली आहे. पुढील दोन दिवस तापमान आणखी कमी होण्याची शक्यता आहे. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यामध्ये कडाक्याची थंडीचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

## शालेय साहित्य वाटप करून ज्योतिबा फुले यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन

### वंचित बहुजन व स्त्रियांना शिक्षणाची दारे उघडणारे क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले होत हनुमंत कांबळे

**बीड । प्रतिनिधी**

मानवामध्ये स्पृश्य, अस्पृश्य उच्च-नीचतेतून व अनिष्ट रुढी परंपरेमुळे हजारो वर्षा शिक्षणा पासून वंचित असलेल्या बहुजन समाज व स्त्रियांना शिक्षणाची दारे आपल्या कृतीतून मुलींची पहिली शाळा उघडून शिक्षणाची दारी उघडणारे क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले १९ व्या शतकातील थोर क्रांतिकारक व समाज सुधारक होऊन गेले असे प्रतिपादन सहाय्यक उपनिबंधक सहकार खाते हनुमंत कांबळे यांनी केले.



महामानव अभिवादन ग्रुप तर्फे आयोध्या नगर व रमाई नगर परिसरातील १४१ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून महात्मा ज्योतिबा फुलेंना विनम्र अभिवादन केले या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी सेवानिवृत्त केंद्रप्रमुख अवसरमोल ए.एल.तर प्रमुख पाहुणे म्हणून महामानवा अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले, सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक एलआयसी यु.एस. वाघमारे, प्रशांत वासनीक, एड. तेजस वडमारे लाभले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डी.जि . वानखेडे यांनी केले तर सूत्रसंचालन डी.एम. राऊत यांनी केले. ह्या प्रसंगी मंचावर कॅप्टन राजाभाऊ आठवले, श्याम वीर, आर.डी. यांची प्रमुख उपस्थिती होती. दुसरे प्रमुख पाहुणे प्रशांत वाचनिक यांनी विद्यार्थी व पालकांशी संवाद साधताना महात्मा ज्योतिबा फुले यांनी अविधेमुळे सर्व सर्वां रसा तळाला गेले कसे हे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. शिक्षण म्हणजे सत्य जाणणे व विज्ञानवादी दृष्टिकोन बाळगून अंधश्रद्धे पासून दूर राहणे हे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून महापुरुषांच्या जयंती, स्मृतिदिनी त्यांच्या विचारावर चालण्याचा दृढ निश्चय करून प्रयत्नाची पराकाष्टा करावी असे आवाहन केले. कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे सीनियर के.जी. मधील आदिरा वडमारे या बालिकेने पाच ओळी संविधाना बद्दल इंग्रजीतून सुस्पष्टपणे भाषण केली त्याबद्दल तिचा वाचाल तर वाचाल वाचनालया तर्फे व महामानव अभिवादन ग्रुप तर्फे रोख रक्कम देऊन सत्कार केला. कार्यक्रमास अनिल वीर,प्रकाश खंडारे, रोहन खंडारे, संगीता खंडारे, मोतीराम मस्के, नागसेन मस्के, गुलाबराव बिक्कड गोदावरी पटेकर, रत्नमाला चक्रे, राधाबाई वीर,अनिल वीर, बाईजाबाई वीर, ज्योती शिरसाठ व परिसरातील बहुसंख्य विद्यार्थी व पालकांची उपस्थिती होती.

### पारंपारिक पिकाला फाटा देत लोहगाव येथील

## सेवानिवृत्त अभियंता श्री मारोती वसमते यांनी फळबाग पेरु लागवड करून केली लाखोची कमाई

**बिलोली । प्रतिनिधी**

बिलोली तालुक्यातील सेवानिवृत्त अधिकारी श्री मारुती वसमते यांनी आपल्या शेतीत पारंपारिक पिकांना फाटा देत चक्क फळबाग पेरु लागवड करून खर्च वगळता आठ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे ते माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या माध्यमातून जलसंधारण, जलसंपदा, पाणी पुरवठा, रस्ता आणि विज असे अनेक राष्ट्र हिताचे कार्य केले ते सेवानिवृत्त झाल्यानंतर ठरवलं की आपण शेतीकडे लक्ष द्यावे व पारंपरिक शेती करण्यापेक्षा आधुनिक तंत्रज्ञान वापरून शेती करावी त्यानंतर ते आपल्या शेतीत वेगवेगळे प्रयोग म्हणून आंबा,चिकू पेरू इत्यादी फळबागांची लागवड केली व




त्यातून त्यांना चांगला फायदा होऊ लागला व ते पुढे फळबाग पेरु लागवड केली त्यातून त्यांना खर्च वगळता दिड एकर शेतीत आठ लाख रुपयांचे पेरूचे उत्पन्न मिळाले त्यांचा शेतकऱ्यांना सल्ला आपण पारंपारिक शेती पिके घेण्यापेक्षा फळबाग, भाजीपाला लागवड करून आपली प्रगती साधवी असे आवाहन त्यांनी केले .

## साळेगाव येथे मोफत डोळे तपासणी शिबिर

**केज । गौतम बचुटे**

कमल नयन ऑप्टिकल आणि श्री हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने केज तालुक्यातील साळेगाव येथे मोफत नेत्र तपासणी आणि सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया व चष्मे आणि औषधी दिली जाणार आहे.

या बाबतची माहिती अशी की, दि. १ डिसेंबर २०२४ रोजी साळेगाव ता. केज येथे डॉ. अजय बुदगुडे यांचे श्री हॉस्पिटल आणि कमल नयन ऑप्टिकल केज यांच्या संयुक्त विद्यमाने परिसरातील नागरिक आणि वयोवृध्द यांच्यासाठी मोफत नेत्ररोग तपासणी शिबिर आयोजित केले आहे. या शिबिरात डोळ्यांची तपासणी तज्ज्ञ डॉक्टर्स करणार असून आवश्यकते नुसार ज्या रुग्णांना



मोतीबिंदू, पडदा, लासरु आणि डोळ्याचे विविध आजारांवर शस्त्रक्रिया करण्याची गरज असेल त्यांच्यावर अल्पदरात शस्त्रक्रिया करून सवलतीच्या दरात औषधी व चष्मे दिले जाणार आहेत. या शिबिराचा लाभ परिसरातील नागरिकांनी घेण्याचे आवाहन डॉ. अजय बुदगुडे आणि सौरभ वरपे यांनी केले आहे.



**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे महासचिव मुकुलजी वासनिक यांची नवी दिल्ली येथे भेट घेतली. या भेटीत त्यांची अनेक राजकीय आणि सामाजिक विषयांवर चर्चा झाली. देशाच्या समोरील आव्हाने, तरुणाईचे भविष्य तसेच सामाजिक व्यवस्थेच्या समोरील आव्हाने यासह अनेक विषयांवर त्यांनी यावेळी चर्चा केली.**

## बालकांचे हक्क यावर जनजागृतीपर कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद



**बीड । प्रतिनिधी**

बाल हक्क सप्ताहानिमित्त 'बालकांचे हक्क' या विषयावर शहरातील तेलगाव रोड येथील राजर्षी शाहू कन्या माध्यमिक विद्यालयात प्रमुख, जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष आनंद यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार (ता.२८) जनजागृतीपर कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव जी.जी. सोनी केले. युनिसेफच्या वतीने सोनिया हंगे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी विधीदूत मिथुन जोगदंड यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुढाकार घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंजि. बलभीमराव जाहेर पाटील होते. सूत्रसंचालन श्री.तिडके यांनी केले. शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती कदम यांनी आभार मानले.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे ऑनलाईन अर्जासाठी १६ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

**बीड । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील इयत्ता ११ वी व त्यापुढील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही, अशा विद्यार्थ्यांना घरभाडे व इतर खर्च भागविण्यासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्यात येते. सन २०२४-२५ या चालू शैक्षणिक वर्षापासून ही योजना ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. त्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे. या योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत १६ डिसेंबरपर्यंत वाढविली आहे. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी



पात्र विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रासह ऑनलाईन पद्धतीने विहित मुदतीत अर्ज करण्याचे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रदीप भोगले यांनी केले आहे.

संपादकीय


# 'केका'वली

केक ही गोष्ट पंचवीस वर्षांपूर्वी आजच्यासारखी सहज उपलब्ध नव्हती आणि 'करिअर ऑप्शन'तर नव्हतीच नव्हती. त्या काळाच्या केकची आज उपलब्ध असलेल्या केकशी तुलना केली तर 'ती माकडापासून माणसाची झालेल्या उत्क्रांती'शीच करावी लागेल. पाव बनवण्याच्या पिठात साखर आणि बटर मिसळून भट्टीत टाकून काढले की जे बनायचे, त्यालाच एकेकाळी केक म्हणत. पण मैदा साखर दूध बटरच्या या भट्टीतील मिश्रणाने केवळ एक 'पाश्चात्य चविष्ट खाद्यपदार्था' या ऐवजी 'कुठल्याही सेलिब्रेशनचा अनिवार्य साथी' असे रूप धारण कधी केले हे कळलेच नाही.

गेल्या तीन दशकांत झालेला हा बदल इतका बेमालूमपणे झाला आहे की केक ही फार दुर्मिळ गोष्ट होती, हे आपण विसरून गेलो आहोत. बटर आणि क्रीमचा वापर केलेला साधा केक आणि त्याचीच दुसरी आवृत्ती ही चॉकलेट केक, असे दोनच प्रकार तेव्हा असायचे. जसजसा केकमधला लोकांचा रस वाढत गेला तसतसे केकने वेगळे रूप धारण करायला सुरुवात केली. केक म्हणजे सपाट गोल किंवा चौकोन आणि इनोव्हेटीव्ह केक म्हणजे ट्युटीफ्रुटी घातलेला, असे थोडे वैविध्य सुरुवातीला आले, पुढे त्याच्या अनेक सुधारित आवृत्त्या येत गेल्या आणि मग ड्रायफ्रुट्सपासून तर अनेक गोष्टींचा अंतर्भाव असण्यापर्यंतची, रंग, रूप, चव, आकार अशी उत्क्रांती त्यात होत गेली. सर्व ठिकाणी, सर्व प्रकारांत आणि अनेक स्वादांत केकने स्वत:ला 'उपलब्ध' करून दिले.सुरुवातीला केक म्हणजे मधल्या वेळेत चहासोबत खाण्यासाठीचा स्पंज केक किंवा मावा केक, एवढेच असायचे. त्यानंतर कुटुंब रचना बदलली, दोघे कमवणारे आणि एक मूल असलेले अशी नवी व्यवस्था आली. 'कार्ट्यांची' लाडकी मुले झाली आणि त्या मुलांच्या वाढदिवसाच्या पार्ट्या होऊ लागल्या. हळदीच्या कार्यक्रमात सुद्धा पांढऱ्यागुलाबी रंगांची पेये रिचवत, लाल हिरव्या रंगाच्या खाण्यांवर ताव मारल्यावर 'केक कापणे' कंपल्सरी होऊ लागले.लग्न ठरले, एन्गेजमेंट झाली, लग्न झाले, ती प्रेग्नंट झाली, बाळ झाले, बाळाला घरी आणले, बाळ एक महिन्याचे झाले, वर्षाचे होईल, मुलाच्या बापाचे प्रमोशन झाले, आईची बदली झाली, डायव्होर्स झाला, मूड झाला असे काहीही निमित्त केकला चालते. दहावी, बारावी पास झाला तर विचारायलाच नको. त्यात आता 'थँक्यू केक'ची भर पडलेली आहे, म्हणजे केवळ बरे वाटावे म्हणून पाठवायचा केक. अलीकडे एका बाईने तिची गाडी उत्तम दुरुस्त केलेल्या मॅकेनिकचे आभार मानण्यासाठी छान केक पाठवला. हल्ली इटुकल्या कुटुंबासाठी लोकप्रिय झालेले छोटे पाव किलोचे 'बेंटो केक' अशा प्रसंगांसाठी खूप चालतात.सुरुवातीला एक-दोन रंगातच आणि तितक्याच स्वादात असलेल्या केकने गेल्या काही वर्षांत सगळे रस, गंध आणि स्वाद स्वतःमध्ये ब्लॅक होल प्रमाणे गिळंकृत करायला सुरुवात केली. त्यामध्ये फळांचे स्वाद होते आणि त्यातूनच पायनॅपल केक ही सगळीकडे कधीही मिळणारी केकची श्रेणी तयार झाली. मग फळांच्या स्वरूप आणि ऋतुनुसार त्यात बदल होत राहिले. उदा. या महिन्यांत मँगो केक मिळतो, पण तो सगळीकडे मिळतो असे नाही. त्याचबरोबर या केकने स्वत:त वेगवेगळ्या मिठाया रिचवायला सुरुवात केली. त्यातून गेल्या काही वर्षांत लोकप्रिय झालेले रसमलाई, गुलाबजाम या मिठायांना कौशल्याने स्वतःच्या आत घेतलेले केक निर्माण झाले. यात थ्रीडी प्रिंटिंग तंत्र आल्यानंतर केकला विविध आकार आणि त्यात कल्पक घटक आणणे शक्य व्हायला लागले. मुलांच्या वाढदिवसाला त्याच्या आवडीची चित्रे असलेले केक यायला लागले. मात्र कितीही प्रयोग झाले तरी सर्वाधिक खपणारा केक हा चॉकलेट केकच आहे.वारेमाप आडवे हात मारल्याने आडवे वाढणारे लोक अचानक हेल्थ कॉन्शसच्या जमातीत सामील व्हायल्यावर मग केकचा मुख्य घटक असलेला मैदा बाजूला पडला आणि त्याच्या जागी गव्हाचे पीठ आले. तेही घातक आहे, असे सांगितले जायला लागले, त्यामुळे ग्लुटन फ्री पीठ म्हणून नाचणी, ज्वारी वगैरेची पीठे आली. (हे केक ज्यांनी खाल्ले त्यांचे शंभर अपराध माफ व्हायला हवेत. कारण, चांगला केक खायचा असेल तर मैद्याला पर्याय नाही, हे लक्षात ठेवावे.) याच मालिकेत पुढे उपवासाचा केक आला. यात राजगिरा किंवा शिंगाड्याच्या पिठाचा वापर होतो. हलकेपणासाठी दही, पिकलेली केळी यांचा वापर करून आध्यात्मक शाकाहारी परिणामही साधला जातो.एकेकाळी गॅसवर खाली रेती ठेवून त्याच्या भोवती हे पीठ साखर आणि दुधबटरचे मिश्रण गोल पसरवून भाजून घ्यावे लागायचे. मग तो केक त्यातील प्रमाण आणि प्रक्रियेनुसार मऊसूत वाटीत 'इडली एवढा नरम' पासून तर 'फरशी तोडणाऱ्या दगडासारखा कठीण' असे कोणतेही रूप तो धारण करायचा. नंतर वेगवेगळ्या प्रकारची ओव्हन्स आली आणि तापमान नियंत्रित करणारी यंत्रे तंत्रे आली. पूर्वी केवळ नवऱ्याच्या वाढदिवशी त्याला खुश करण्यासाठी किंवा मुलांचा वाढदिवस साजरा करण्यापुरती मर्यादित असलेली घरी केक बनवण्याची हौस लॉकडाउनच्या काळात नोकरी गमावलेल्या अनेकांसाठी संसार सावरणारी ठरली. अनेक महिलांना लोणची पापडाच्या पारंपरिक गृहउद्योगाव्यतिरिक्त अधिक ग्लॅमरस कमाईचा पर्याय त्याने दिला. शहराच्या प्रत्येक गल्लीत नवीन केकची दुकाने रेस्तराँच्या वेगात उघडायला लागली. अनेक ठिकाणी आपापल्या पद्धतीची आणि लौकिकाची केकची दुकाने आहेत. प्रत्येकाच्या हातानुसार त्याची चव बदलते. प्रत्येक जण आपली सर्जनशीलता त्याच्यामध्ये आणतो आणि आपल्या पद्धतीने ती लोकप्रिय करतो.पूर्वी केक केवळ खाण्यासाठी असायचा, आता तो लावण्यासाठी पण वापरला जातो. गेल्या पंचवीस वर्षात महत्त्वाची घडामोडी घडली ती म्हणजे कॉर्पोरेट संस्कृतीचे आगमन. त्यातून मुख्यतः पाश्चात्य संस्कृती वेगाने लोकांच्या आयुष्यात शिरली. या कार्पेट कल्चरमध्ये एक एचआर नावाचा प्रकार आला. त्यांनी कर्मचाऱ्यांचे वाढदिवस साजरे करण्यास सुरुवात केली. मग त्यामध्ये दोन केक मागवले जाऊ लागल, एक खाण्यासाठी, एक फासण्यासाठी. ते खूप लोकप्रिय झाले आणि केकची विक्रीही दुप्पट झाल्याने अर्थकारणाला वेग आला. ऑफिसमधली संस्कृती साहजिक घरीही आली. मग घरच्या मंडळींवरही असे प्रयोग सुरू झाले.ॲल्युमिनियम भांड्यांपासून मायक्रोव्हेव, ओटीजी अव्हनपर्यंत त्याचे रूप बदलले आहे. आधीचा केक नुसता 'असायचा', आता त्यावर दुनिया 'वसलेली' असते. ही कलात्मक मांडणी कधी कधी अविश्वसनीय असते. मात्र असे केक मुख्यत: पाहण्यासाठी असतात. पण केकचा खरा आस्वाद घ्यायचा असेल तर उत्तम रेड वेल्वेट किंवा उत्कृष्ट चीज केक (विथ रासबेरी सॉस ऑफकोर्स) याचा एक मोठा तुकडा घेऊन कोपऱ्यात एकटे बसावे. जसजसा तो चमच्या चमच्याने पोटात जातो, तसतशी आतमध्ये रुतून बसलेली दु:खे आणि जगाबद्दलच्या शिकायती यांची डोळ्यावाटे वाफ बाहेर जाते. पूर्वी केक पोट भरायचे, आता मनात आनंद भरतात.बेकिंग तंत्रात साधने महत्त्वाचीच, तसे त्यांचा वापर करण्याचे कौशल्यही महत्त्वाचे. यात अचूकता महत्त्वाची, अत्यंत काळजीपूर्वक तापमाने बघावी लागतात. काही मागेपुढे झाले तर टेक्श्चर बदलते. अन्य पदार्थांनुसार, मीठ, तिखट टाकून पुन्हा शिजवून, गोडवा आदी बदलता येत नाही. जागतिकीकरणात देशसीमांच्या पलीकडे पसरलेल्या आणि ऑटोमेशनने सगळे सपाट झालेल्या जमान्यात जगभर मिळणाऱ्या केकने आपली स्थानिक आणि खासगी वैशिष्ट्ये टिकवून ठेवली आहेत. याची हीच सुंदर बाजू आहे की, औद्योगिकीकरण, तंत्रज्ञान खूप वेगात वाढलेले असले तरी केक अजूनही माणसाच्या हाताच्या स्पर्शाला भुकेलेली आणि त्याच्या अधीन असलेली कला आहे. ती तंत्र आणि कला याचा संगम आहे. त्याचे औद्योगिकीकरण झालेले नाही. इति 'केका'वली संपूर्ण.

# डोळ्यातील भावना डोळेच वाचू शकतात!

आपल्यालाही एखाद्या व्यक्तीचे आयुष्य उजळून टाकायचे असेल, तर आपण आपल्या नजीकच्या नेत्रदान हॉस्पिटलमध्ये संपर्क करून नेत्रदानासाठी नोंदणी करू शकतो. नेत्रदान ही संकल्पना राबविण्याचा दिवस म्हणजे जागतिक दृष्टीदान दिवस होय. प्रत्येक व्यक्तीने नेत्रदानाचा संकल्प केल्यास मोठ्या प्रमाणात जगातील नेत्रहीन व्यक्तींच्या दृष्टींना प्रकाशमान करु शकू. आजच्या काळात नेत्रदान संकल्पाचा विचार आणि आचार सामान्य माणसाच्या मनावर बिंबवण्याची गरज आहे. महत्त्वपूर्ण व ज्ञानवर्धक असा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर संकलित लेख जरूर अभ्यासा... संपादक.



मानवी जीवनात मरणोत्तर डोळेच फक्त अंधाना मदत करू शकतात. तेव्हा दृष्टी दानामुळे एक माणूस दुसऱ्या अंध माणसाचे जीवन प्रकाशमय करून त्याला सामान्य जीवन जगण्यास मदत करु शकतो. नेत्रदानाची प्रक्रिया मृत्युच्या काही तासांत-शक्यतो व्यक्तीच्या मृत्यूनंतर सहा तासांच्या आत करण्यात येते. नेत्रदानाचा निर्णय घेतलेल्या एका मृतव्यक्तीचे डोळे एका नेत्रहीन व्यक्तीला देण्यात येतात. त्यामुळे त्या अंधव्यक्तीचे जीवन प्रकाशमय होते. आपल्यालाही एखाद्या व्यक्तीचे आयुष्य उजळून टाकायचे असेल, तर आपण आपल्या नजीकच्या नेत्रदान हॉस्पिटलमध्ये संपर्क करून नेत्रदानासाठी नोंदणी करू शकतो. नेत्रदान ही संकल्पना राबविण्याचा दिवस म्हणजे जागतिक दृष्टीदान दिवस होय. प्रत्येक व्यक्तीने नेत्रदानाचा संकल्प केल्यास मोठ्या प्रमाणात जगातील नेत्रहीन व्यक्तींच्या दृष्टींना प्रकाशमान करु शकू. आजच्या काळात नेत्रदान संकल्पाचा विचार आणि आचार सामान्य माणसाच्या मनावर बिंबवण्याची गरज आहे.

अलीकडे दृष्टीला फार महत्त्व प्राप्त झाले आहे. दृष्टी या शब्दावरून अलीकडे बऱ्याच प्रमाणात टोमणे मारता येतात. सरकारला दृष्टी नाही, जाणूनबुजून धृतराष्ट्राची भूमिका घेत आहे; तसेच प्रत्येक आई-वडील आपल्या मुलांना भावी काळात दूरदृष्टी ठेवून भावी जीवनात कोण व्हायचे आहे, हे ठरवून वाटचाल कर! असे सतत खुणावत असतात. एकंदरित काय? तर दृष्टी ही फार महत्त्वाची आहे. कलियुगात दानाला फार महत्त्व प्राप्त झाले आहे. अवयवदान, रक्तदान, नेत्रदान, अन्नदान आदींना फार महत्त्व आहे. धनदान, अन्नदान यापेक्षा जर नेत्रदान करून एखाद्या अंधव्यक्तीला दृष्टी दिली, तर हा दाता आयुष्यात आपल्या कर्तबगारीने खुप मोठा होईल. त्याच्या हातून हे एक श्रेष्ठ समाजकार्य देखील घडेल. १० जून हा जगभर दृष्टिदान दिवस म्हणून साजरा केला जातो; कारण त्या दिनाचे औचित्य साधून दृष्टिदानाचे स्मरण राहील. त्यामुळे मरणोत्तर नेत्रदानाची इच्छा असणाऱ्या व्यक्ती आताच नेत्रपेढीत जाऊन विहित नमुन्याचा फॉर्म भरून दिला, की मरणोत्तर नेत्रदानाचे कार्य सत्कारणी लागेल. एखाद्या व्यक्तीच्या शरीराचे सर्व भाग महत्वाचे असतात, परंतु यामध्ये डोळ्यांना थोडे अधिक महत्त्व असते. डोळे ही देवाने दिलेली सर्वोत्कृष्ट अमूल्य देणगी आहे. ज्याचे डोळे नसतात त्यांच्याकडूनच त्याचे मूल्य चांगले समजू शकते. मृत्यूनंतर डोळे दान देऊन आपण कोणालाही नवीन जीवन देऊ शकतो. नेत्रदानाचे महत्व लक्षात घेऊनच दरवर्षी १० जून हा दिवस जगभर अंतरराष्ट्रीय दृष्टिदान दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. या माध्यमातून लोकांना नेत्रदानाचे महत्त्व सांगून नेत्रदानाची जनजागृती केली जाते. जागतिक नेत्रदान दिनाचे उद्दिष्ट व नेत्रदानाचे महत्व या बद्दलची जनजागृती करून लोकांना किंवा त्यांच्या नातेवाईकाच्या मृत्यूनंतर डोळे दानास प्रवृत्त करणे आहे. अंधत्व ही विकासशील देशांमध्ये प्रमुख सार्वजनिक आरोग्याच्या समस्यांपैकी मुख्य समस्या आहे. जागतिक आरोग्य संघटना- डब्ल्यूएचओ अनुसार कार्निया संबंधित आजार, मोतीबिंदू आणि काचबिंदू नंतर होणाऱ्या दृष्टीहानी आणि अंधत्वाच्या मुख्य कारणांपैकी आहे.

सुप्रसिद्ध नेत्रविशारद डॉ.आर. ए.भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस दृष्टिदान दिन म्हणून साजरा केला जातो. मृत्यूनंतर नेत्रदान करावे, याच्या प्रसारासाठी स्वयंसेवी संस्था पुढे सरसावत आहेत. आज २१व्या शतकातील विज्ञान इतके पुढे गेले आहे, की एका व्यक्तीचे डोळे आणि पर्यायाने त्याची दृष्टी घेऊन ते दुसऱ्याला म्हणजे ज्या व्यक्तीला दृष्टी नाही, अशा व्यक्तीला सहज देता येतात. त्यामुळे त्या अंध व्यक्तीचे भविष्य उज्ज्वल होऊ शकते. दान देणाऱ्या अशा व्यक्ती एकप्रकारे समाजसेवा करीत असल्याचे श्रेय त्यांना मिळते. अशा सामाजिक स्वरूपाच्या केलेल्या दानामुळे त्या व्यक्तीच्या मनाला शांती, सुख, समाधान व पुण्यही प्राप्त होते. डोळे ही ईश्वराने मानवाला दिलेली फार मोठी लखलाभ देणगी आहे; परंतु काही व्यक्ती यापासून वंचित असतात. काही कारणास्तव त्यांना अंधत्व प्राप्त होते. जन्मानंतर त्यांना अंधत्व येते. त्यामुळे अशा व्यक्ती जगाचे सौंदर्य पाहू शकत नाहीत. सौंदर्याने भरलेली सृष्टी ज्यांना पाहता येत नाही, ते या सृष्टीसौंदर्याला मुकतात. या व्यक्तींना नेत्र मिळाले, तर ते सृष्टीचा आस्वाद घेऊ शकतील. माणुसकी या नात्याने दृष्टी असणाऱ्या व्यक्तीने दृष्टिहीन व्यक्तीला नेत्रदान केले, तर दात्याच्या जीवनाचे नक्कीच सार्थक होईल. मानवी जीवनात दृष्टीला प्रचंड महत्व आहे, कारण डोळे असले तर कोणतेही काम मनुष्य सहज करु शकतो. त्यामुळे दृष्टी आड सृष्टी किंवा असेल दृष्टी तर दिसेल सृष्टी या म्हणी प्रचलित झाल्या आहेत. माणूस जगातील सृष्टिसौंदर्य आपल्या चक्षुंद्वारे अंतःकरणात साठवून ठेवू शकतो. त्यामुळे मानवाच्या पंच इंद्रियांमध्ये डोळ्यांना मानाचे स्थान आहे. डोळ्यांचा उपयोग नयनरम्य, मनोहर सृष्टीसौंदर्य आस्वाद घेण्याबरोबर त्यांची छबी सुंदर चित्राद्वारे इतरांनाही देता येते. दृष्टीहिन मानवाला नयनसुख मिळून जगाच्या सौंदर्याचा आस्वाद घेता यावा, यासाठी नेत्रदान, डोळेदान किंवा दृष्टिदान करण्याचा निर्णय प्रत्येक मानवाने केल्यास त्याचा फायदा जगातील नेत्रहीन मानवास निश्चितच होवू शकेल. अर्थात व्यक्तीने मरणोत्तर नेत्रदान केल्यास मानवी जीवनात त्याचा उपयोग अंध व्यक्तीस निश्चितच होईल.

डोळ्यांमुळे माणसांच्या चेहऱ्यावरील हावभाव, स्वभाव प्रत्येक व्यक्ती सहज ओळखू शकतो. त्यामुळेच विविध भाषांमध्ये डोळ्यांच्या विशेषणांची गाणी तयार झाली आहेत. उदा. डोळ्यात वाच माझ्या तू गीत भावनांचे, डोळे हे जुलमी गडे रोखूनी मज पाहू नको आदी. डोळे माणसाला सौंदर्याबरोबरच अनेक गोष्टी शिकवतात. ते इतर अवयवांपेक्षा अधिकची माहिती माणसाला देतात, जसे की चेहरेपट्टी वरून ओळखला जाणारा व्यक्तीचा स्वभाव, कोणत्याही गोष्टीकडे पाहण्याची दृष्टी त्यातून घेतला जाणारा बोध, त्यामुळे दृष्टिदानाचे महत्व चटकन माणसाला जाणवते. दृष्टीहीन या सर्व गोष्टींना मुकतो, त्याच्या जीवनातील अंधार दूर होण्यासाठी किमान प्रत्येक व्यक्तीने मरणोत्तर नेत्र दान करण्याचा संकल्प केला पाहिजे. भारत सरकारने यासाठी विविध योजना हाती घेतल्या आहेत. दृष्टिविकार प्रतिबंधक आणि अंधत्व नियंत्रण कार्यक्रम हा शंभर टक्के केंद्र सरकार पुरस्कृत असून अनेक नेत्रपेढ्या, फिरती नेत्रपथके कार्यरत आहेत. राज्यात सुमारे नऊ लाखांपेक्षा जास्त अंध व्यक्ती असून या नेत्रदान जागृतीमार्फत लाखो व्यक्तींना दृष्टी प्राप्त होऊ शकते. सन १९७९नंतर अंधत्व निवारणासाठी नेत्रशिबीर कार्यक्रम घेण्यात आले आहेत. महाराष्ट्रात जवळजवळ १३ नेत्रचिकित्सक पथके स्थापन करण्यात आली आहेत. नेत्रदान हे सर्वश्रेष्ठ दान मानण्यात आले आहे; शिवाय नेत्रदान हे मृत्यूनंतर करायचे असल्याने कसलीच भीती नाही. नेत्रदानासाठी व्यक्तीच्या मृत्यूनंतर दोन तासांच्या आत डोळे काढले गेले पाहिजेत. नेत्रदान करणाऱ्या त्याच्या नातलगांकडून पूर्ण प्रक्रिया करून घेण्याची जबाबदारी सोपवावी; म्हणून जिवंतपणी त्या व्यक्तीने संबंधित नातेवाइकांना ही जबाबदारी सोपवून तशी नोंद विहित फॉर्मवर नोंद करावी. टाइम्स आय रिसर्च फाउंडेशनच्या एका पाहणीनुसार ५.५ लाख नेत्रदात्यांपैकी १५ ते ४० वयोगटातील, तर केवळ ४ टक्के व्यक्ती ही ६० वर्षांवरील वयोगटातील आहेत, तर हे प्रमाण वाढणे ही काळाची गरज आहे.

!! विश्व नेत्रदान दिनानिमित्त सर्वांना संपूर्ण सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.**

# युवकांमधील वाढत्या आत्महत्या

आजच्या बदललेल्या, वेगवान जीवनशैलीत ताणतणाव आणि त्यातून उद्भवणाऱ्या मनोविकारांचे वाढते प्रमाण सर्वसामान्यांच्या मनात धडकी भरवणारे आहे. चिंता, नैराश्य, बायपोलर डिसऑर्डर, स्किझोफ्रेनिया, मादक पदार्थांची व्यसने या सर्व विकारांनी बाधित व्यक्तींची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या मानसिक विकारांच्या जंजाळातून उद्भवणाऱ्या आत्महत्या हा सामाजिक चिंतेचा विषय बनला आहे. संगणक आणि मोबाइल तंत्रज्ञानाचे फायदे युवा पिढीला होत आहेत; पण त्याचीच दुसरी दुर्दैवी बाजू म्हणजे, या तांत्रिक प्रगतीतून जन्माला येणारे मनोविकार आणि आत्महत्या युवकांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळत आहेत. गेल्या काही वर्षांतील भारतीय तरुणांच्या आत्महत्यांची आकडेवारी आणि त्यामागील कारणे पाहिल्यास अनेक गोष्टी स्पष्ट होतात. सन २०१४ ते २०२१ या सात वर्षांत पुरुषांनी आत्महत्या करण्याच्या घटनांमध्ये २५ टक्क्यांनी वाढ झाली, असा दावा 'द लॅन्सेट' या वैद्यकीय नियतकालिकाच्या, 'रिजनल हेल्थ'च्या अहवालात करण्यात आला होता. सन २०१४मध्ये ४२,५२१ महिलांनी, तर ८९,१२१ पुरुषांनी आत्महत्या केली. सन २०२१मध्ये हे प्रमाण २.६४ पटीने वाढले. त्या वर्षी ४५.०२६ महिलांनी, तर १,१८,९७९ पुरुषांनी आत्महत्या केल्या.



ट्रेंड आणि आकडेवारी

सन २०२४मध्ये आयोजित केलेल्या 'स्कोपिंग रिव्ह्यू'मध्ये भारतीय किशोरवयीन आणि तरुण मुला-मुलींमधील आत्महत्येच्या पद्धती व जोखीम घटक तपासले गेले. त्यातील प्रमुख निष्कर्षांनुसार :

अलीकडे किशोरवयीन मुलांमध्ये आत्महत्येचे प्रमाण चिंताजनक वाढले आहे.

गळफास लावून घेणे आणि विषारी पदार्थ घेणे या पद्धती किशोरवयीन मुले सर्वाधिक वापरतात. भारतीय तरुणांमध्ये सर्वांत जास्त प्रमाणात नोंदवलेल्या गेलेल्या जोखीम घटकांची टक्केवारी काळजी निर्माण करणारी वाटते. १. मानसिक आरोग्य समस्या (५४.२८ टक्के) : यामध्ये चिंताविकार, नैराश्य आणि व्यसनांचा समावेश होता.

२. नकारात्मक किंवा क्लेशदायक कौटुंबिक समस्या (३४.२८ टक्के) : जीवनशैलीतील बदलांमुळे कुटुंबांच्या दैनंदिन जीवनात बदल झाले आहेत. आई-वडिलांचे एकमेकांशी असणारे संबंध, संभाषणे आणि कलह नकारात्मकतेच्या दिशेने प्रवास करू लागले आहेत. मुलांना दिला जाणारा वेळ घटतो आहे. त्यांच्यावर मूलभूत संस्कार अभावानेच केले जात आहेत आणि मुलांना सामाजिक वर्तणुकीची जाणीव करून देण्याबाबतची जबाबदारी नाहीशी होत आहे. पालकांच्या आर्थिक, मानसिक आणि सामाजिक समस्यांचे, असंस्कृत वर्तणुकीचे क्लेशकारक अनुभव मुलांना अधिक जाणवत आहेत.

३. शैक्षणिक ताण (२२.८५ टक्के) : शालेय आणि महाविद्यालयीन पातळीवरील शैक्षणिक ताण खूप वाढतो आहे. पदव्युत्तर शिक्षणासाठी, तसेच सरकारी नोकऱ्यांसाठीच्या स्पर्धा परीक्षा मुलांवर असह्य ताण निर्माण करतात.

४. सामाजिक/जीवनशैली घटक (२० टक्के) : पाश्चात्त्य जीवनशैलीचे अनुकरण करण्याची इच्छा; विशेषतः महागडी उपकरणे, वस्त्रे, फॅशनच्या अंतर्गत येणाऱ्या गोष्टी, स्त्री-पुरुष संबंध, इच्छेनुसार न मिळाल्यामुळे किंवा त्यात मनाला त्रास देणाऱ्या घटना घडल्यामुळे होणाऱ्या आत्महत्या.

५. हिंसा (२२.८५ टक्के) : कौटुंबिक हिंसाचार, पालकांचे एकमेकांमधील हिंसक वाद, मुलांना होणारी मारहाण, शेजारी किंवा मित्रांकडून होणारी शाब्दिक आणि शारीरिक हिंसा, मुला-मुलींवर होणारे लैंगिक अत्याचार हे घटक यामध्ये प्रामुख्याने येतात.

६. आर्थिक संकट (८.७५ टक्के) : पालकांवर उद्भवणारी आर्थिक संकटे, युवकांचे वैयक्तिक सबंध, इंटरनेट; तसेच सोशल मीडियातून मिळणारी आभासी प्रलोभने आणि त्यातून उद्भवणारी आर्थिक संकटे.

७. नातेसंबंध (८.७५ टक्के) : घटत चाललेले कौटुंबिक आणि नातेसंबंध, मैत्री, प्रेमप्रकरणातील निराशा हे सारे 'रिलेशनशिप'बाबतचे प्रश्न, हा एक महत्त्वाचा घटक आज झपाट्याने वाढत चालला आहे.

शैक्षणिक ताण

शैक्षणिक दबाव हे भारतीय तरुणांना आत्महत्येसाठी प्रवृत्त करणारे महत्त्वाचे कारण आहे. एका सर्वेक्षणात, १५-२५ वर्षे वयोगटातील ६५ टक्के युवकांनी शैक्षणिक ताणतणाव, पालकांच्या अपेक्षा, अपयश आणि नातेसंबंधातील समस्यांमुळे आत्महत्या केल्याची नोंद केली गेली आहे. सन २०२१मध्ये १८ ते ३० वर्षे वयोगटातील ५६,५४३ व्यक्तींनी आत्महत्या केल्या. यामध्ये ७१४ युवकांमध्ये परीक्षेत अयशस्वी होणे, हे आत्महत्येचे कारण आढळले.

प्रतिबंधात्मक उपायांची गरज

या निष्कर्षांमधून, नेमकी कारणे शोधून, युवकांमधील आत्महत्यांबाबत प्रतिबंधक उपायांची गरज अधोरेखित होते. मानसिक आरोग्याचा पाठपुरावा, जागरूकता शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर होणे गरजेचेच आहे. टेलिव्हिजन, चित्रपट, संगणक आणि मोबाइलमधून निर्माण होणाऱ्या आभासी जगाचे परिणाम मुलांवर होण्याआधीच कसे रोखता येतील याचा विचार; त्याबाबतच्या योजना राष्ट्रीय स्तरावर कार्यान्वित करणे महत्त्वाचे ठरते. मानसिक आरोग्याला सामाजिक गरज म्हणून प्राधान्य दिले पाहिजे. घरातील किशोरांसाठी, तरुणांसाठी पोषक वातावरण हवे. प्रत्येक भारतीयाने एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी, ती म्हणजे व्यावसायिक मदत घेणे आणि मानसिक समस्यांसाठी असलेली अधिकृत हेल्पलाइन वापरणे. यामुळे अनेक संभाव्य घटना आधीच लक्षात येऊ शकतात. स्वतःच्या किंवा ओळखीच्या कुणाच्याही आयुष्यात मानसिक समस्या असल्यास मनोविकारतज्ज्ञांची, प्रमाणित व्यावसायिकांची मदत घ्यायला टाळाटाळ करू नका.

# निसटत्या पराभवाचा दिलदारपणे स्वीकार करून पृथ्वीराज साठे यांनी मतदारसंघात सुरू केला आभार दौरा

## आभार दौऱ्यात अनेक ठिकाणी मतदार होत आहेत भावूक

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यात नुकत्याच विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूका संपन्न झाल्या. निवडणुकीसाठी उभे असलेल्या काही उमेदवारांना जय ते काहींना पराजय स्वीकारावा लागला. विधानसभेच्या निकालानंतर शरदचंद्र पवार यांनी सर्व पराभूत उमेदवारांची बैठक बोलावून त्यांना पराभवाने खचुन न जाता पुन्हा जोमाने जनतेत मिसळून त्यांची कामे करण्यासाठी प्रेरित केले. शरद पवारांचा या वयातील देखील उत्साह व ऊर्जा पाहून बैठकीत उपस्थित सर्व उमेदवारांना नवीन स्फूर्ती मिळाल्याचे जाणवले.

झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान केज विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांचा केवळ २६०० मतांनी निसटता पराभव झाला. मात्र झालेल्या पराभवाने खचून न जाता त्यांनी त्या पराभवाचा मोठया दिलदार पणे स्वीकार करून मतदारसंघातील अवघ्या १,१४,३९४( एक लाख चौदा हजार तीनशे चौर्यांनऊ ) मतदारांनी मतदानरुपी दिलेल्या आशीर्वादाबद्दल त्या सर्व मतदारांचे आभार व्यक्त करण्यासाठी पृथ्वीराज साठे यांनी संपूर्ण मतदारसंघात गुरुवार दि २८ पासून मतदारांसाठी आभार दौरा सुरु केला आहे. या दौऱ्यात जागोजागी मतदार बंधू भगिनी या अत्यंत भावूक होऊन पृथ्वीराज साठे यांचे स्वागत करत करून त्यांनी दाखवलेल्या दिलदार पणाचे कौतुक देखील करताना दिसून येत आहेत. केज विधानसभा मतदार



संघासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून निवडणुक लढवण्यासाठी उभे होते. मतदानावेळी उमेदवारी जाहीर होण्यासाठी झालेल्या विलंबामुळे प्रचारासाठी अत्यंत कमी कालावधी मिळाला होता. मात्र अशाही परिस्थितीत त्यांनी रात्रीचा दिवस करून संपूर्ण मतदार संघ पिंजून काढत प्रत्येक मतदारपर्यंत पोचण्याचा प्रयत्न केला व त्यात ते यशस्वी देखील झाले होते. त्याचेच फलित म्हणून पृथ्वीराज साठे यांना केज मतदार संघातुन १,१४,३९४ मतदान मिळाले आहे. मतदान दिलेल्या सर्व मतदारांचे आभार व्यक्त करणे हे आपले कर्तव्य असल्याच्या भावनेने पृथ्वीराज साठे यांनी दि २८ गुरुवार पासून मतदारांचा आभार दौरा सुरू केला आहे. आजपर्यंत पृथ्वीराज साठे यांनी आभार दौऱ्यादरम्यान मतदार संघातील, आनंदवाडी, मांडवखेल, कळसंबर, भंडारवाडी, कारेगव्हाण,वडगाव कळसंबर, सोनपेठ, जैताळवाडी, येळंबघाट, खर्डेवाडी,धावाज्याचीवाडी, पांढऱ्याचीवाडी, बाळापूर, अंबिल वडगाव, सात्रा पोतरा, मुर्षदपूर, सावरगाव, अंधापुरी, नेकनूर, श्री क्षेत्र चाकरवाडी टाकळी, कोरेगाव, शिरपूर, जाधवजवळा, कदमवाडी,डोणगाव, मस्साजोग, आरणगाव,क ाळेगाव,पिंप्री, कापरेवाडी, केवडगाव, बोरगाव,भोपळा, वरपगाव ,चिंचोली, सारूकवाडी, डोका, सातेफळ, हदगाव, मांगवडगाव, लाखा, आणि साळेगाव गावात प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील गावकऱ्यांचे व मतदारांचे आभार व्यक्त केले.या भेटीदरम्यान पृथ्वीराज साठे यांच्या निसटत्या पराभवामुळे मतदार बंधू भगिनींच्या डोळ्यात अश्रू दाटून आल्याचे अनुभवताच साठे देखील अनेक वेळा गहिवरून येत होते. मात्र उलटपक्षी साठेच मतदारांना खचून जाऊ नका यापुढेही मी सदैव आपल्या सुखदु:खाचा साक्षीदार होणार असल्याचे सांगत आपण यापुढेही एकदिलाने काम करण्याचे आवाहन करत होते. महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना केज मतदार संघातून मतदारांसह खासदार बजरंग सोनवणे, राजकिशोर मोदी,डॉ नरेंद्र काळे, हारून इनामदार, सौ. सिताताई बनसोड,सुरेशतात्या पाटील यांच्यासह अनेक नेत्यांची मोलाची साथ मिळाली.

## महायुतीत मतभेद नाही

# तिन्ही पक्ष मिळून उच् पदाचा निर्णय घेऊ-देवेंद्र फडणवीस

**नागपूर (वृत्तसंस्था)**

आमच्या महायुतीमध्ये कुठलेही मतभेद नाहीत, असे म्हणत भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेवर भाष्य केले आहे. नागपूर येथे पत्रकारांशी देवेंद्र फडणवीस यांनी संवाद साधला. पक्ष श्रेष्ठींशी चर्चा करून पुढील वाटचाल ठरवली जाणार असल्याचे देखील त्यांनी यावेळी सांगितले आहे.

देवांद्र फडणवीस म्हणाले, शिंदे साहेब असतील, पवार साहेब असतील निश्चितपणे आम्ही सगळे एकत्रितच आहोत. आमच्या महायुतीमध्ये कुठलेही मतभेद नाहीत. आम्ही निवडणुकीच्या पूर्वी देखील सांगितले होते की सगळे निर्णय सोबत बसून होतील. आमचे श्रेष्ठी असतील ते आमच्यासोबत बसून सगळे निर्णय घेतील. त्यामुळे मला असे वाटते की कोणाच्या मनात किंतु परंतु असेल तर आज माननीय एकनाथ शिंदे साहेबांनी तो देखील दूर केला आहे.पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुख्यमंत्रिपदाबाबतच्या चर्चेला लवकरच आपल्याला उत्तर मिळेल. तिन्ही पक्ष मिळून मुख्यमंत्रिपदाबाबतचा निर्णय लवकरच घेतील. आम्ही सगळे पक्ष श्रेष्ठींशी चर्चा करत आहोत. लवकरच आपल्याला याचे उत्तर मिळेल. आधी मुख्यमंत्री ठरेल आणि मुख्यमंत्री ठरल्यानंतर ते मंत्रीपदे कोणाला द्यायची हे ठरवतील. त्यामुळे मला




असे वाटते की, आधी मुख्यमंत्र्यांची वाट पाहावी. त्यानंतर मंत्र्यांची देखील जी नावे आहेत, ती लक्षात येतील.पुढच्या प्रक्रियेवर कशी असणार आहे, असा प्रश्न विचारला असता त्यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले, या संदर्भात आमचे श्रेष्ठी यांच्यासोबत बैठक होईल आमची. तसेच यावेळी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होणार अशी चर्चा सुरू आहे यावर प्रतिक्रिया विचारली तेव्हा फडणवीसांनी हात जोडले.दरम्यान, एकनाथ शिंदे यांनी आज पत्रकार परिषद घेत भाजपला पाठिंबा जाहीर केला आहे. मुख्यमंत्रिपदावरील दावा देखील त्यांनी सोडला असल्याचे स्पष्ट झाले आहे. अडीच वर्ष त्यांनी पाठिंबा दिला आहे, असे शिंदे म्हणाले. तसेच उद्या दिल्लीत महायुतीच्या नेत्यांची महत्त्वाची बैठक होणार आहे. या बैठकीत अंतिम निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ३० किंवा १ तारखेला शपथविधी होऊ शकतो, असे अजित पवारांनी सांगितले आहे.

## पराभव मोठ्या मनाने मान्य करावा लागतो

# धनंजय मुंडेंचा नाना पटोलेंना टोला ईव्हीएमवर बोलणे हा भाबडेपणा

**शिर्डी (वृत्तसंस्था)**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी निवडणूक आयोगावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. जनतेची मते चोरण्याचे काम निवडणूक आयोग करत असल्याचा आरोप नाना पटोले यांनी केला होता. यावर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते धनंजय मुंडे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. पराभव मोठ्या मनाने मान्य करावा लागतो. आम्ही लोकसभा निवडणुकीवेळी मान्य केला होता, असे मुंडे म्हणाले. जनतेने आम्हाला दिलेला यश हे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी मोठ्या मनाने कबूल करावे, असा टोलाही धनंजय मुंडे यांनी नाना पटोले यांना लगावला.विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला. त्यांना ५० चा आकडाही गाठता आला नाही. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी या पराभवाचे खापर ईव्हीएमवर फोडले. नाना पटोले यांनी निवडणूक आयोगाला सवाल मतदानाच्या टक्केवारीत झालेल्या तफावतबाबत उत्तर मागितले. यावर धनंजय मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली. ते शिर्डी येथे माध्यमांशी बोलत होते.धनंजय मुंडे म्हणाले, तुम्ही लोकसभेत जिंकता तेव्हा तुम्हाला जनतेने जिंकवले. आता तुम्ही विधानसभेत हरता तेव्हा तुमची ही हार ईव्हीएममुळे झाली, अशा पद्धतीचा सुरू असलेला भाबडेपणा महाराष्ट्रातील जनतेला कळून चुकला आहे. ईव्हीएमबाबत मतदान कसे झाले? उशिरा का झाले? याबाबत बोलण्यात काहीही अर्थ नाही. पराभव मोठ्या मनाने मान्य करावा लागतो. आम्ही देखील लोकसभा निवडणुकीतील पराभव मान्य केला होता. तेव्हा आम्ही ईव्हीएम वगैरे बोललो नाही, असे ते म्हणाले.जनतेने आम्हाला दिलेला यश हे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी मोठ्या मनाने कबूल करावे, असा टोला धनंजय मुंडे यांनी नाना पटोले यांना लगावला. मंत्रीपदाबाबत महायुतीचे वरिष्ठ नेते जो निर्णय एकत्रित बसून घेतील, तो आम्हा सर्वांना मान्य असणार आहे, असेही त्यांनी सांगितले.धनंजय मुंडे यांनी विजय वडेट्टीवार यांच्यावरही टीका केली. काँग्रेसचे नेते जे म्हणतायत किंवा आरोप करताय त्यांची काय अवस्था झाली हे त्यांनी एकदा बघावे. ते कोठे होते आणि आता कुठे आले आहेत. त्यांनी जी काही आहे, तेवढी पण ठेवली नाही. जेवढी लाज राहिली आहे तेवढी तरी त्यांनी राखावी. २०२९ चे सांगण्यापेक्षा आज महाराष्ट्रातील मायबाप जनतेने तुम्हाला जो धडा शिकवला, त्याबद्दल बोला ना? अशी टीका त्यांनी विजय वडेट्टीवार यांच्यावर केली.

# राज ठाकरे यांचे पराभूत उमेदवारांना ईव्हीएम विरोधात पुरावे गोळा करण्याचे निर्देश

**पुणे (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज पुण्यात मनसेच्या पराभूत उमेदवारांची बैठक घेतली. राज ठाकरे यांनी उमेदवारांचे म्हणणे ऐकून घेतले. यावेळी पराभूत उमदेवारांनी ईव्हीएमवर संशय व्यक्त केला. निवडणुकीत कोणते फॅक्टर महत्त्वाचे ठरले यावरही बैठकीत चर्चा झाली. राज ठाकरे यांनी सर्वांची मते ऐकून घेतली. तसेच ईव्हीएमबाबत पुरावे गोळा करण्याच्या सूचना उमेदवारांना दिल्या. या सर्व घडामोडींवर राज ठाकरे लवकरच आपली भूमिका मांडणार आहेत.

राज ठाकरे यांनी घेतलेल्या बैठकीत राज्यातील मनसेचे पराभूत झालेले ८२ उमेदवार तसेच त्या-त्या जिल्ह्यांचे जिल्हाध्यक्ष उपस्थित होते. यावेळी निवडणुकीसंदर्भात उमेदवारांकडे विचारणा करण्यात आली. यावेळी उमेदवारांनी ईव्हीएमवर संशय व्यक्त केला. मनसेचे माजी आमदार राजू पाटील यांनी आपल्या गावात एकही मत न मिळाल्याचे म्हटले आहे. हडपसर मतदारसंघात मतमोजणीमध्ये मनसेच्या उमेदवाराला १००० मते जास्त मिळाली. तर राष्ट्रवादीच्या उमेदवाराला ६०० मते जास्त मिळाल्याचे सांगण्यात आले. पोस्टल मतमोजणीवेळी महाविकास आघाडीला बहुमत मिळण्याचा अंदाज दिसत होता. मात्र, ईव्हीएम मशीनमधील मतमोजणी झाल्यानंतर सगळे निकाल वेगळे लागायला लागले. अशा अनेक शंका मनसेच्या उमेदवारांनी या बैठकीत सांगितल्या.

# साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरू झाला,कारखान्यांची धुराडी पेटली भावाचे काही ठरेना शेतकऱ्यांना ऊस दराची अपेक्षा

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीचा हंगाम संपला. आता साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरू झाला. आतापर्यंत जिल्ह्यात २३ पैकी केवळ १६ कारखान्यांचीच धुराडी पेटली आहेत. दराबाबत कोणी अवाक्षरही काढलेले नाही.या निवडणुकीत बहुतांशी साखर कारखानदारांचा पराभव झाल्याने आणखीच शांतता पसरली आहे. निवडणुकीमुळेच यंदाच्या हंगामास उशीर झाला. हंगामाच्या तोंडावर निवडणुका आल्याने दराबाबत चढाओढ लागेल, अशी अपेक्षा होती. मात्र, तसे झाले नाही. उलट ऊस हंगमाकडे सर्वांचेच दुर्लक्ष झाले. बहुतांशी साखर कारखानदार हे विधानसभेसाठी उमेदवार होते. त्यांच्याकडून दर जाहीर झाला नाही. आचारसंहितेमुळे कदाचित त्यांना अडचण आली असावी. परंतु शेतकऱ्यांत यंदा कोणता कारखाना किती दर देतो, याची उत्सुकता आहे.

जिल्ह्यातील तब्बल २२ कारखाने परवान्याच्या प्रतीक्षेत होते. त्यापैकी केवळ सोळा कारखान्यांनाच गळीताचा परवाना मिळाला आहे. साखर आयुक्त कार्यालयाच्या पोर्टलवर जिल्ह्यातील २२ कारखान्यांनी गळितासाठी परवाना मागितला होता. त्यातील १६ साखर कारखान्यांनी हंगाम सुरू केला आहे.

जिल्ह्यात १३ सहकारी आणि ९ खासगी, असे २२ कारखाने आहेत. त्यांनी सर्वांनी परवान्यासाठी अर्ज केला आहे. मंत्री गटाने १५ नोव्हेंबरपासून हंगाम सुरू करण्यास परवाना होता. त्यानंतर टप्प्याटप्प्याने परवाना मिळाला. उर्वरित कारखान्यांचे परवाने प्रलंबित आहेत. नगर जिल्ह्यात यंदा १ लाख ४२ हजार ६४९ हेक्टरवरील ऊस गळीतासाठी उभा आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा ऊस कमी नाही. गेल्या वर्षी १ लाख ५० हजार हेक्टरवर ऊस होता. मात्र, मागील वर्षीच्या तुलनेत यंदा कारखानेही कमी आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची धास्ती वाढली आहे.जिल्ह्यात अंबालिका, बारामती, मुळा, ज्ञानेश्वर, नागवडे, थोरात, कोल्हे, काळे हे कारखाने उसाला चांगला दर देण्यात आघाडीवर असतात. मात्र, त्यातील बहुतांशी कारखानदारांना या निवडणुकीत पराभवास सामोरे जावे लागले. ऊसदराबाबतची कोंडी कधी फुटते, याविषयी उत्सुकता लागली आहे. कुकडीचे राहुल जगताप, नागवडेचे अनुराधा नागवडे, केदारेश्वरचे प्रताप ढाकणे, ज्ञानेश्वरचे चंद्रशेखर घुले, मुळाचे शंकरराव गडाख, प्रसादचे प्राजक्त तनपुरे, थोरातचे बाळासाहेब थोरात यांचा या निवडणुकीत धक्कादायक पराभव झाला. त्याचा दरावर परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांना आहे.

श्रीगोंदे तालुक्यातील ओंकार आणि कुकडी साखर कारखान्यांचे परवाने रखडले आहेत. त्यांचे प्रस्ताव कारखानास्तरावरच आहेत. विविध योजनांचा निधी न भरल्याने त्यांचे प्रस्ताव परत पाठवले आहेत. त्यात संगमनेर तालुक्यातील गजानन कारखान्याचाही समावेश आहे. केदारेश्वर, स्वामी समर्थ, वृद्धेश्वर आणि गणेश कारखान्याचा परवाना आयुक्त स्तरावर प्रलंबित असल्याचे सूत्रांनी सांगितले. कागदपत्रांची पूर्तता झाल्यास परवाने दिले जाणार आहेत.

प्रवरा, कोल्हे, अशोक, नागवडे, थोरात, अगस्ती, मुळा, काळे, गौरी शुगर, ज्ञानेश्वर, क्रांती, प्रसाद, ढसाळ, अंबालिका, गंगामाई, बारामती (हळगाव), नाशिकमधील द्वारकाधिश, नाशिक व एस. जे. या कारखान्यांना गळीताचे परवाने मिळालेले असुन हे कारखाने नगर कार्यालयाअंतर्गत येतात.



## एकनाथ शिंदेंच्या बंडामुळेच भाजप सत्तेत

# लाडक्या भावाकडे दुर्लक्ष करता येणार नाही ;बच्चू कडू यांची मुख्यमंत्री पदासाठी शिंदे यांना पसंती



**मुंबई (वृत्तसंस्था)**
भाजप सत्तेत आला ते एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे. भाजप सत्तेत आलीच नसती तर आज जे चित्र दिसत आहे, तसे चित्र दिसले नसते. शिंदेंनी बंड केले नसते तर लाडकी बहिणी योजना देखील आली नसती. त्यामुळे ज्या लाडक्या भावाने लाडकी बहीण योजना शोधून काढली. त्या लाडक्या भावाकडे तुम्हाला दुर्लक्ष करता येणार नसल्याचे प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांनी म्हटले आहे. या माध्यमातून मुख्यमंत्री पदाबाबत एकनाथ शिंदे यांचा दावा प्रबळ करण्याचा प्रयत्न कडू यांनी केला.
२०१४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर तसेच एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिंदे यांना साथ देण्यासाठी गुवाहाटीला पोहोचलेले आमदार बच्चू कडू यांचा आता विधानसभा निवडणुकीत पराभव झाला आहे. मात्र तरी देखील त्यांनी एकनाथ शिंदे यांची साथ सोडलेली नाही. भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या यशामध्ये एकनाथ शिंदे यांचा मोठा वाटा असल्याचे बच्चू कडू यांनी म्हटले आहे.जातीचा नव्हे तर धर्माचा फॅक्टर या निवडणुकीत महत्त्वाचा ठरला असल्याचा दावा बच्चू कडू यांनी केला आहे. धर्माचा झेंडा जिंकला असून आमच्या सेवेचा झेंडा या निवडणुकीत हरला असल्याचे देखील ते म्हणाले. झेंडे जिंकले, सेवा हरली....
कुठल्याही निवडणुकीत पारदर्शकता असली पाहिजे. मात्र ईव्हीएम मध्ये पारदर्शकता नाही असा आरोप देखील त्यांनी केला. जगातील सर्व देश बॅलेट पेपरवर निवडणुका घेत असतील तर भाजप बॅलेट पेपरवर निवडणूक घेऊ असे का म्हणत नाही? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला.राज्यामध्ये महायुतीला बहुमत मिळाले असले तरी देखील महायुतीचा मुख्यमंत्री कोण? याबाबत अद्याप नाव समोर आलले नाही. विद्यमान काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नावाची चर्चा सुरू असताना भारतीय जनता पक्षाच्या वतीने देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होतील, असर दावा केला जात आहे. त्यामुळे याबाबत राज्यात राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. यातच आता बच्चू कडू यांनी देखील एकनाथ शिंदे यांच्या नावाला पसंती दिली आहे.

## आंबेडकरांच्या 'वंचित'मुळे महायुतीचा २० जागांवर फायदा

# शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे ८, ठाकरेंच्या शिवसेनेचे ६,काँग्रेसचे ६ उमेदवार पडले






**मुंबई (वृत्तसंस्था)**
विधानसभा निवडणुकीत प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीमुळे महायुतीचा एक-दोन नव्हे, तर तब्बल २० जागांवर फायदा झाल्याचे समोर आले आहे. तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ८, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे ६ आणि काँग्रेसचे ६ उमेदवार पडलेत.विधानसभेत आलेल्या भाजपच्या आणि लाडक्या बहिणीच्या लाटेत मुस्लीम मतदार वंचितच्या पाठीमागे मोठ्या संख्येने उभा राहिल्याचे दिसून आले. याचा फटका मात्र महाविकास आघाडीला बसल्याचे दिसले.प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीमुळे शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे फहाद अहमद, राजेंद्र शिंगणे, राहुल मोटे, राजेश टोपे, सतीश चव्हाण, संदीप नाईक यांना अगदी थोड्या मतांनी पराभवाला सामोरे जावे लागले. तर काँग्रेसचे धीरज देशमुख, दिलीप सानंद, वसंत पुरके यांचाही अगदी कमी मतांनी विजय हुकला.वंचित बहुजन आघाडीकडे दलित आणि मुस्लिमांची मते वळाली. त्यामुळे भाजपचे अतुल सावे, प्रशांत बंब, रमेश कराड, मंदा म्हात्रे, मेघना बोर्डीकर, आकाश फुंडकर हे अतिशय काटावर विजयी झाले. तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे तानाजी सावंत आणि संजय गायकवाड यांच्या विजयातही वंचित बहुजन आघाडीने मते घेतल्याने हातभार लागला.वंचित बहुजन आघाडीने विधानसभा निवडणुकीत २०० जागा लढल्या. मात्र, त्यांच्या १९४ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार एका जागेवर दुसऱ्या तर ५८ जागांवर तिसऱ्या स्थानी राहिले. त्यांना १४ लाख २२ हजार म्हणजेच ३.१ टक्के मते मिळाली. तर मे महिन्यात झालेल्या लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीला १५ लाख ८२ हजार म्हणजेच ३.६ टक्के मते मिळाली होती.प्रकाश आंबेडकरांनी अल्पसंख्याक मतदार जास्त असणाऱ्या मतदारसंघात मुस्लीम उमेदवार दिले. त्यामुळे पूर्वाश्रमीचा मित्रपक्ष 'एमआयएम'ला जबर फटका बसला. या पक्षाचे औरंगाबाद मध्य मतदारसंघातील उमेदवार सिद्दिकी नसुरीद्दीन तकुद्दीन आणि औरंगाबाद पूर्वचे उमेदवार इम्तियाज जलील यांना पराभवाचा सामना करावा लागला.वंचित बहुजन आघाडीकडून प्रकाश आंबेडकरांनी राज्यात सर्वात अगोदर विधानसभा उमेदवारांची यादी जाहीर केली होती. पहिल्या यादीमध्ये त्यांनी ११ उमेदवारांची नावे जाहीर केली होती. विशेष म्हणजे पक्षाने रावेर विधानसभा मतदारसंघात शमिभा पाटील या ट्रान्सजेंडर उमेदवाराला तिकीट दिले होते. वंचितच्या यादीत उमेदवारांच्या नावासह त्यांच्या जातीचाही उल्लेख केला होता.

# मविआकडून १४ कोटी मतदारांचा अपमान-चंद्रशेखर बावनकुळे

## जनतेने मविआचा करेक्ट कार्यक्रम केला

**मुंबई । प्रतिनिधी**
महायुती सरकार उत्तम काम करू शकते हा विश्वास असल्यानेच महाराष्ट्रातील १४ कोटी जनतेने मते दिली आहेत. महाविकास आघाडीकडून ईव्हीएमवर अविश्वास दाखवून मतदारांचा अपमान केला जात आहे, अशी टीका भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आमदार श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. लोकसभेच्या पराभवाचे आम्ही आत्मचिंतन केले, त्यातून शिकलो व पुढे गेलो आणि जिंकलो. जनतेने डबल इंजिन सरकारला मतं दिली आहेत. जनतेने मविआचा करेक्ट कार्यक्रम केला आहे तसेच ४४० व्होल्टचा करंटही दिला आहे, असाही टोला त्यांनी लगावला.



कोराडी(नागपूर) येथील जनसंपर्क कार्यालयात श्री. बावनकुळे माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलत होते. नांदेडच्या पोटनिवडणुकीत काँग्रेसचा उमेदवार विजयी झाला, त्या ठिकाणी ईव्हीएम चांगली होती का? असा प्रश्नही श्री बावनकुळे यांनी केला. ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्रातील मतदारांनी महायुती सरकारच्या योजनांना मत दिले आहे. आमचे सरकार उत्तम काम करू शकते, असा जनतेचा विश्वास आहे, म्हणूनच हा जनादेश मिळाला आहे. लोकसभेत मविआचे खासदार निवडून आले, तेव्हा ईव्हीएम चांगली होती. सध्या महाविकासवाल्यांना झोप लागत नाही. त्यांना जेव्हा झोप लागायला लागेल तेव्हा ते शांत होतील. महाविकासच्या लोकांनी तोंडाच्या वाफा काढण्यापेक्षा आपली मते का कमी झाली याचे चिंतन करावे.
तीन पक्षांचे सरकार बनवताना थोडा वेळ लागतोच, मंत्रीपद कसे वाटायचे, कोणाला कोणते खाते द्यायचे, पालकमंत्री कुठे कोण असेल हे सर्व सूत्र तयार करून सरकार तयार होते. नुसतेच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांचे नाव निश्चित करणे एवढेच नसते. त्यामुळे काही काळ जाईल आणि लवकरच सरकार बसेल. शपथ नोव्हेंबर मध्ये होईल की डिसेंबर मध्ये होईल, हे काही पॅरामीटर नाही. सध्या काळजीवाहू सरकारचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असल्याचेही बावनकुळे यांनी सांगितले. भारतीय जनता पार्टीच्या प्रत्येकाला देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री व्हावेत असे वाटते, महायुतीमधील मित्रपक्षांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे नेते मुख्यमंत्री व्हावेत, अशी इच्छा आहे. यावर तिन्ही पक्षाचे नेते बसून निर्णय घेतील. केंद्रीय नेतृत्वाने घेतलेल्या निर्णयावर भाजपाचा कार्यकर्ता कधीच नाराज होत नाही. त्यांचा निर्णय अंतिम असतो. पक्षाचे नेते योग्य निर्णय करतात. लवकरच महायुतीचा मुख्यमंत्री शपथ घेणार. उद्धव ठाकरेंनी जेव्हा भाजपासोबत बेईमानी केली, तेव्हा त्यांना सरकार बनवण्यासाठी दीड महिना लागला होता, असाही टोला बावनकुळे यांनी लगावला.

# विरोधकांनी रडीचा डाव न खेळता मोठ्या मनाने पराभव स्वीकारावा भाजपा गटनेते आ.प्रविण दरेकर



**मुंबई। प्रतिनिधी**
ईव्हीएमवर संशय व्यक्त करणाऱ्या विरोधकांना भाजपा विधानपरिषद गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी चांगलेच खडेबोल सुनावले आहेत. विरोधकांनी आता रडीचा डाव खेळू नये.
लोकशाहीत जय पराजय होत असतात. विरोधकांनी मोठ्या मनाने पराभव स्वीकारावा, असा सल्ला दरेकर यांनी दिला आहे. ते पत्रकारांशी बोलत होते.

विरोधकांनी उपस्थित केलेल्या ईव्हीएमच्या मुद्द्यावर बोलताना दरेकर म्हणाले की, विरोधकांनी आता रडीचा डाव खेळताना दिसताहेत. कर्नाटकमध्ये जिंकले त्यावेळी ईव्हीएमवर संशय नव्हता. झारखंडला जिंकले तिथे हेच ईव्हीएम होते आणि लोकसभेला निवडणुका झाल्या त्या ईव्हीएमवरच झाल्या. मतदारांनी कौल दिल्यानंतर लोकशाहीत जय पराजय होत असतात, आपण मतदारांच्या कौलाचा सन्मान करण्याची गरज आहे. आरोप करणाऱ्यांनी, निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीनी आपापल्या आमदारकीचा राजीनामा द्यावा आणि आपली भूमिका मांडावी. रडीचा डाव खेळू नका,मोठ्या मनाने पराभव स्वीकारा. लोकशाहीत जय पराजय होत असतात, असा टोलाही दरेकरांनी विरोधकांना लगावला.
उद्धव ठाकरे यांना टोला लगावताना दरेकर म्हणाले की, त्यांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. कुणी कुणाला संपवत नसतो, जो-तो आपल्या कर्माने-कृतीने संपत असतो. पक्षाला अपयश आले म्हणजे संपले असे काही नाही. त्यांनी मेहनत घेऊन पुन्हा पक्ष उभा करावा, राजकारणात यश अपयश येतच असते. आमच्या पक्षाने लोकसभेला महाराष्ट्रात अपयश पाहिलेय. आम्ही खचून न जाता काम केले, जनतेचा विश्वास संपादित केला. फक्त फेसबुक लाईव्ह केले म्हणजे जनता स्वीकारते असे नाही.दरेकर पुढे म्हणाले की, दुधाला अनुदान देण्याचे काम आमच्या सरकारने केले होते. जयंत पाटील, बंटी पाटीलचा दूध संघ आहे म्हणून राजकीय सुडाने कुठलीही कारवाई करणार नाही. देवेंद्र फडणवीस यांनी आधीच सांगितलेय विरोधी पक्षांच्या चांगल्या सूचना आम्ही स्वीकारू, सुडाने कुठल्याही प्रकारचे राजकारण होणार नाही. पण काही राजकीय नेते सुडाने वागले आणि त्याचा सर्वसामान्य शेतकरी, दूध उत्पादकांना त्रास झाला तर त्याची योग्य ती दखल घेऊन सरकार कारवाई करेल.

# राष्ट्रवादीच्या सुनील तटकरेंनी घेतली मोदींची भेट:महाराष्ट्राचा मुख्यमंत्री लवकरच ठरणार



**मुंबई (वृत्तसंस्था)**
राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली आहे. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची देखील सुनील तटकरे यांनी भेट घेतली आहे. महायुतीला विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या प्रचंड यशासाठी त्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी ही भेट घेतली असल्याचे त्यांनी सांगितले आहे.सुनील तटकरे यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देखील भेट घेतली आहे. सागर या शासकीय निवासस्थानी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन विधानसभा निवडणुकीत महायुतील मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केले, यावेळी त्यांनी स्वागत सत्कार करत शुभेच्छा दिल्या असल्याचे सुनील तटकरे यांनी सांगितले आहे.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्यावर सुनील तटकरे यांनी कोकण विभागातील काही प्रश्नांबाबत अवगत केले. या हिवाळी अधिवेशन काळात या प्रश्नांवर सकारात्मक तोडगा काढण्याचे मोदींनी आश्वासित केले असल्याची माहिती सुनील तटकरे यांनी दिली आहे. मात्र, अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने भाजप नेत्यांच्या भेटीगाठी सुरू केल्याने राजकीय वर्तुळात वेगळी चर्चा सुरू झाली आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी पंतप्रधान मोदी, अमित शहा तसेच देवेंद्र फडणवीस यांच्या भेटी घेतल्याने आता महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात वेगळी चर्चा सुरू झाली आहे. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील आज पत्रकार परिषद घेत मुख्यमंत्री पद सोडण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांचा मुख्यमंत्रिपदाचा मार्ग मोकळा झाला असल्याचे बोलले जात आहे.
एका वृत्तवाहिनीशी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस मुख्यमंत्री पदाच्या शर्यत आहे का? या प्रश्नावर उत्तर देताना सुनिल तटकरे म्हणाले, मुख्यमंत्री पदाचा निर्णय राष्ट्रीय पातळीवर होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार त्या ठिकाणी आहेत. त्यांच्यासंदर्भात वरिष्ठ पातळीवर निर्णय घेतला जाईल. तसेच महायुतीचा कोणताही फॉर्म्युला ठरला नव्हता. जे काही ठरेल ते एक दोन दिवसात ठरेल, असे सुनील तटकरे यांनी स्पष्ट केले.
तसेच भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी देखील पत्रकार परिषद घेत मुख्यमंत्री शिंदे यांनी घेतलेल्या भूमिकेचे स्वागत केले आहे. यापूर्वी अजित पवारांनी भाजपच्या मुख्यमंत्रीपदाला पाठिंबा दिला होता. यामुळे शिवसेना शिंदे गटाची मोठी गोची झाली होती. शिवसेनेकडून मुख्यमंत्री पदासाठी दावा केला जात होता. तर श्रीकांत शिंदे यांना उपमुख्यमंत्री करा, अशी मागणी देखील एकनाथ शिंदे यांनी केली होती. यामुळे महायुतीमध्ये काही काळासाठी पेच निर्माण झाला होता.आता एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान मोदी तसेच अमित शहा यांच्यासोबत चर्चा केल्यानंतर अखेर त्यांची भूमिका बदलली आहे. अडीच वर्ष त्यांनी आपल्याला पाठिंबा दिला आहे, असे म्हणत त्यांनी भाजपला पाठिंबा दिला असल्याचे दिसून आले.
छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकारांशी बोलताना अजित पवार यांनी सांगितले की एकनाथ शिंदे यांची पत्रकार परिषद मी ऐकली आणि त्यांनी घेतलेल्या भूमिकेचे मी स्वागत करतो. तसेच उद्या दिल्ली येथे महायुतीची संयुक्त बैठक होणार असून त्यात महत्त्वाचे निर्णय घेतले जाणार आहेत. उद्याच्या चर्चेनंतर अंतिम स्वरूप येईल.पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, सुप्रीम कोर्टाने कालच सुनावले आहे. निवडणुकीत पराभव झाला की इव्हीएमच्या माथी मारला जातो. जिथे ते जिंकतात तिथे इव्हीएम चांगले एकदम बेस्ट असते का? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला. दारुण पराभव झाला आहे त्यांचा, आता हे कसे सांगणार म्हणून इव्हीएमवर ढकळून द्यायचे काम विरोधक करत आहेत, असे म्हणत महाविकास आघाडीवर अजित पवारांनी टोला लगावला आहे.शपथविधी कधी होईल असा प्रश्न विचारला असता अजित पवार म्हणाले, या मंथ एंडपर्यंत होईल, अशी माहिती त्यांनी दिली आहे. ३० किंवा १ तारखेला शपथविधी होण्याची शक्यता आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077